महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय
१७ डॉ. आंबेडकर मार्ग,लालदेवळासमोर, पुणे ४११ ००१

Phone : (020) 26125696
Fax : (020) 26122217
w'site : www.dydepune.co.in
e-mail : dydpune.egov@gmail.com

## शालेय शिक्षण विभाग

जा.क्रं. शिउसं/माध्य/३०४/अवाभो/२०२६/
दिनांक –

प्रति
अध्यक्ष/सचिव,
ग्रीन अर्थ एज्युकेशन ट्रस्ट,
नांदे – बालेवाडी रोड, म्हाळूंगे, पुणे.

विषय : दुबार सत्रामध्ये शाळा चालविण्यास परवानगी मिळणेबाबत.
**ग्रीन अर्थ एज्युकेशन ट्रस्ट, नांदे – बालेवाडी रोड, म्हाळूंगे पुणे.**

संदर्भ : अध्यक्ष/सचिव, ग्रीन अर्थ एज्युकेशन ट्रस्ट, नांदे – बालेवाडी रोड, म्हाळूंगे पुणे यांचे पत्र दि.१०/०६/२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये ग्रीन अर्थ एज्युकेशन ट्रस्ट, नांदे – बालेवाडी रोड, म्हाळूंगे पुणे संचलित ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल बालेवाडी, म्हाळुंगे, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याच्या हेतुने शाळा दोन सत्रांमध्ये चालविण्यासाठी आपणांकडून या कार्यालयाकडे विनंती करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५५.१ नुसार शाळेच्या जागेची अडचण दूर करण्यासाठी समुचित प्राधिका-यांनी शाळांची निकड म्हणून त्यांना दोन पाळयांत काम करण्याची परवानगी देण्याची तरतूद आहे. मात्र, अशा शाळेत प्रवेश घेवू इच्छिणा-या या सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देउ शकणारी व अशा पध्दतीने काम करणारी त्याच प्रकारची इतर कोणतीही शाळा त्या वस्तीत नसली पाहिजे. तसेच माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५५.३ (अ), (ब), (क), व (ड) प्रमाणे वस्तुस्थिती असल्यास सदर शाळेस त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शाळा दोन पाळयांमध्ये भरविता येईल, अशी तरतुद आहे. तसेच सी.बी.एस.ई मंडळाचे नियम २०१८ मधील नियम क्र.१५.३ मध्ये शाळा दोन सत्रामध्ये भरविण्याबाबत तरतुद नमुद केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शाळा दोन सत्र/पाळयांमध्ये सुरू करण्यासाठी शाळेने उक्त नमुद अटींखेरीज बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ मधील सर्व तरतुदींचे पालन करण्याच्या अटी/शर्तींच्या अधीन राहून सदर शाळेस दुबार सत्रामध्ये शाळा चालविण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर बाबत कोणत्याही शिक्षक, विद्यार्थी वा पालक यांच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. उक्तप्रमाणे नमूद केलेल्या कोणत्याही नियमाचे शाळेने उल्लंघन केल्यास सदर आदेश तात्काळ प्रभावाने रद्द समजण्यात येतील याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Ganpat Shankarrao More
Date: 01-07-2026
16:18:55

(डॉ. गणपत मोरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

प्रत माहितीस्तव सादरः शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.

Mr Shivan Nair
Digitally signed by Mr Shivan Nair
Date: 2026.09.30 15:23:55 +05'30'

Mr Abhishek Bagchi - Principal GIIS Balewadi
Digitally signed by Mr Abhishek Bagchi - Principal GIIS Balewadi
Date: 2026.09.30 15:23:37 +05'30'